आरोग्य सेवा

जा.क्र.उजिरुसा/आरोग्यशिबिर/दरपत्रक/37-59-60/२४

वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१, उ.जि.रु. सावंतवाडी

दिनांक :- १५/१०/२०२४

## दरपत्रक सुचना

उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी येथे दि. २३.१०.२०२४ ते २६.१०.२०२४ या कालावधीत आयोजित वैदयकीय व दंत शिबिरातील रुग्णांकरीता तातडीची बाब म्हणुन कापडसाहित्य खरेदी करीता पुरवठाधारकांकडुन खालील अटींच्या अधीन राहून मोहर बंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अटींची पुर्तता करणाऱ्या पुरवठादारांनी दरपत्रके सही करणार यांचे नावे सादर करावे.

| अ.क्रं. | साहित्याचे नांव | परिमाण | प्रतिनग दर (सर्व करांसहीत) | मागणी संख्या | एकुण दर (सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्जन गाऊन (निळे कापड) | फुल साईज | | २० | |
| २ | डॉक्टर शर्ट | फुल साईज | | २० | |
| ३ | डॉक्टर पॅन्ट | फुल साईज | | २० | |
| ४ | प्लेन टॉवेल | | | २० | |
| ५ | होल टॉवेल (हिरवे कापड) | ७० से.मी. | | १० | |
| ६ | ॲब्डॉमन सिट (हिरवे कापड) | फुल साईज | | २० | |
| ७ | बालरुग्ण (वय ६ते १६) शर्ट | | | १० | |
| ८ | बालरुग्ण (वय६ ते १६)पॅन्ट | | | १० | |

## दरपत्रकांच्या अटी व शर्ती

१) इच्छुक पुरवठाधारकांनी मोहोरबंद दरपत्रके दिनांक १९/१०/२०२४ रोजी सांयकाळी ३.०० पूर्वी उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी येथील कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये सादर करावेत. दरपत्रक लखोटयावर "रुग्णालयीन कापड साहित्य खरेदी करीता दरपत्रके" असे नमुद करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२) सिलबंद लखोटे दिनांक १९/१०/२०२४ रोजी सायं ०४.०० वाजता वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी यांचे कक्षात उघडणेत येतील. सादर करणारे संबधित पुरवठाधारकाने स्वतः अथवा आपले प्रतिनिधी यांनी दिलेल्या दिवशी वेळेत उपस्थित रहावे. उपस्थीत राहिले नाही तरी

दरपत्रक उघडून न्युनतम दराने पुरवठा करणारे व्यावसायिक यांचे दर निश्चित करुन स्विकृत करणेत येतील.

३) **सदर खरेदी दि. २३.१०.२०२४ ते २६.१०.२०२४ या कालावधीत होणा-या आरोग्य शिबिराकरीता तातडीची बाब म्हणुन करण्यात येत असलेने पुरवठा आदेश प्राप्त झालेवर लगेचच म्हणजेच दि. २२.१०.२०२४ पर्यंत पुरवठा करणे बंधनकारक राहील** याची नोंद घ्यावी.

४) सर्व दर हे सर्व करांसहीत, उचल ठेव, हमाली, वाहनावळ इ.सहीत खरेदीसाठी नमुद करावे.

५) दरपत्रके मंजुर झालेस, पुरवठाआदेशाप्रमाणे साहित्याचा पुरवठा वैदयकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी, खासकील वाडा, मोतीतलाव जवळ, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथे करावयाचा आहे.

६) वरील साहित्याचा कपडा व शिलाई चांगल्या प्रतीची असावी.

७) पुरवठा आदेशानुसार विहित कालावधीत पुरवठा न झालेस अथवा निकृष्ठ दर्जाचा पुरवठा केलेस दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल अथवा पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील.

८) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (जीएसटी नं) प्रमाणपत्र व पॅन कार्ड साक्षांकीत प्रत जोडावी.

९) दुकान, साहित्य पुरवठा/विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत सांक्षांकीत करुन जोडावा.

१०) इच्छुक पुरवठा धारकाने सोबत सादर केलेल्या नमुन्यातील स्वघोषणापत्र संबंधित पुरवठाधारकाचे लेटरहेडवर लिहुन सादर करावे.

**११) दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा तसेच खरेदी करावयाच्या साहित्यात आवश्यकतेप्रमणे बदल करण्याचा अथवा दरपत्रक सुचना रद्द करण्याचा अंतिम अधिकार वैदयकीय अधिक्षक, उ.जि.रु. सावंतवाडी यांनी राखुन ठेवले आहेत.**

१२) स्विकृत केल्यापासुन विहित केलेल्या स्विकृत केलेले दर ३१ मार्च २०२५ पर्यंत वैद्य असतील.

१३) साहित्य प्राप्त झालेनंतर इ.सी.एस./आर.टी.जी.एस./ पी.एफ एम.एस व्दारे देयकाची अदायगी करणेत येईल. त्याकरीता बँक खात्याची माहिती सोबत सादर करावी.

Medical Superintendent, Cl.1
Sub-District Hospital, Sawantwadi

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात जाहिरनामा तयार करावा

## स्वघोषणापत्र

१) मी/ आम्ही असे जाहिर करतो की, या दरपत्रकामध्ये किमान मुल्यापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवसाय काळया यादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी किंवा त्यांचेशी संबंधित आरोग्य संस्था या मध्ये कोणतेही नाते व हितसंबंध नाहीत.

२) मी/ आम्ही असे जाहिर करतो की, माझे / आमचे व्यवसायाचे जीएसटी- वस्तु व सेवाकर याची नोंदणी झालेली असून वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवाकर परतावा नियमित भरणेत येतो.

३) मी/ आम्ही असे जाहिर करतो की, माझे/ आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी - वस्तु व सेवाकर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेऊन इतर खोडावे.

स्थळ :-
दिनांक :-

नाव व सही, रबरीशिक्का

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करीतो की मी/आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पुरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदे सोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे/आहोत.

जर माझी/आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधिल राहू. या अटी व शर्तीचा भंग मी/ आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीला नुसार मी/आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलानुसार मी/आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी/आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलानुसार अट क्र. १ ते १३ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळः

दिनांकः

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नावः

पत्ताः